तथास्तु २०१७ / ४/९ पान ४४

# असा पाहिला औदुंबर मी

असा पाहिला औदुंबर मी
वृतस्थ जगला जीवन सारे
निष्ठेसाठी, मांगल्यासाठी
फुलविल गेला श्रावण सारे.
ऋतुचक्राच्या तालावरती
कधी बहरला वठला अवचित
सौंदर्याच्या दारिद्र्याने
उरात झुरला झाला भयभीत
किती सोसले वादळ वारे
सैरभैरही मन पांघरले.
वैशाखाच्या वणव्यामधुनि
मर्म जिव्हारी अंकुर धरले.
संत मुनींचे विशाल अंबर
कधी न भुलला आत्मरुपावर
अनामिकही बळीराजाने
पुलकित झाला परमात्म्यावर
सदा डंवरला प्रसन्न झुलला
विश्वगतीचा जणू कलस्वामी
विश्वधर्म जपण्यास्तव झिजला
असा पाहिला औदुंबर मी

सहदेव मखामले